# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/07/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## विनयभंग

पो.स्टे. काटोल :— दिनांक ०६/०७/२०२३ चे १८.३० वा. ते १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी वय १५ वर्ष ही आपल्या तिघी मैत्रिणीबरोबर टयुशनला गेल्या होत्या. टयुशन संपल्यावर तिघीही घरी जाण्याकरीता निघाले तेव्हा **आरोपी नामे— १) आरोपी नामे— तुषार तुळशिराम नासरे, वय २१ वर्षे २) रोशन शेषरावजी वरोकर, वय २४ वर्षे दोन्ही रा. खैरगाव ता. नरखेड जि. नागपुर** हे फिर्यादीचा पाठलाग करत त्यांच्या बद्दल बोलत होते. तेव्हा फिर्यादीने एका मैत्रिणीला तिचे घरी सोडले व नंतर दुसरी मैत्रिण व फिर्यादी ही घरी जात असता त्यांचे पाठी मागेमागे मैत्रिणीचे घरपर्यंत आले फिर्यादीने मैत्रिणीला घरी सोडुन आपली सायकल जोरात चालवुन घरी जाण्याकरीता निघाली तेव्हा दोघेही आपले मोटर सायकलने फिर्यादीचे मागे आले व फिर्यादी सोबत बोलु लागले फिर्यादी त्यांचे सोबत बोलली नाही तेव्हा फिर्यादीची आते बहीण दिसली तिला फिर्यादीने सांगीतले कि हे दोघेही माझे मागे मागे आले. फिर्यादी सोबत बोलत आहे असे सांगीतले तेव्हा ते दोघे मोटरसायकल वरून मागे पाहत होते. हातवारे करीत होते त्यावरून फिर्यादीचे बहीण हिने जवळ असलेल्या पानठेल्यावाल्याला काही मुले आमचा पाठलाग करीत असल्याबाबत सांगितले असता पानठेलावाल्याने त्यांचे ओळखीचे दोन तिन माणसे घेवुन त्या दोघांना पकडुन ठेवले. फिर्यादीचे बहिणीने पोलिसांना फोन केला व पोलिस तेथे येवुन त्या दोघांना पोलिस स्टेशन काटोल येथे आणले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५४, ३५४ (अ), ३५४(ड) भादवि. सहकलम १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे पोलीस स्टेशन काटोल मो. नं. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

## ऑनलाईन फसवणुक

पो.स्टे. मौदा :— दिनांक ३०/०६/२०२३ चे १०.०० वा. ते दिनांक ०१/०७/२०२३ चे १५.०० वा. दरम्यान फिर्यादीच्या इंस्टाग्राम आयडी lisa –franken –hfx1 वर वेळोवेळी मॅसेज आले की शेअर मार्केट मधील क्रिप्टो करंशी मध्ये पैशाची गुंतवणुक केल्यास तुम्हाला भरपुर लाभ होणार असे सांगितले असता फिर्यादी हिने dilip.traders@paytam वर विश्वास ठेवुन तिने आपला मित्र नामे— सौरभ खरवडे यांच्या बॅंक अकाउंट मधुन ६३,९८०/—रू. व फिर्यादीच्या बॅंक अकाउंट मधुन ६०,९९०/—रू. हे पैसे यू पी आय आय डी dilip.traders@paytam वर असा एकुण १,२४,९७०/—रू. चे फिर्यादीची ऑनलाईन फसवणुक झाली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक फौजदार प्रतिभा तेलगोटे ब.न १०९३ मो. क्र. ९०४९१६७६५३ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर